12 JUL 2026
तरूण भारत

# उत्तेजक द्रव्य, क्रीडा विषयावर विद्यापीठात १७ रोजी चर्चासत्र

- क्रीडा व शारीरिक शिक्षण आधिविभागातर्फे आयोजन : तज्ज्ञांकडून मार्गदर्शन

त. भा. प्रतिनिधी

**कोल्हापूर :** गेल्या काही वर्षांपासून स्थानिकपासून ते आंतरराष्ट्रीय विविध खेळांच्या स्पर्धांमधील सहभागी खेळाडू उत्तेजक द्रव्यांचे सेवन करत असल्याचे आढळून येत आहे. झटपट यश मिळवण्याच्या लालसेपोटी खेळाडू उत्तेजक द्रव घेत असले तरी त्याचे साईड इफेक्ट अतिशय वाईट आहेत. सर्वात वाईट म्हणजे फक्त खेळाडूच नव्हे तर शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थीनीही उत्तेजक द्रव्यांच्या आहारी गेल्या आहेत. याबाबत जागृती करण्याबरोबर योग्य निकर्ष्यांपर्यंत जाण्यासाठी शिवाजी विद्यापीठातील क्रीडा व शारीरिक शिक्षण आधीविभागाने दि. १८ जुलै रोजी डोपिंग, क्रीडा मानसशास्त्र व डायट या विषयावर चर्चाचे आयोजन केले आहे.

विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात दुपारी २ ते सायंकाळी ५ यावेळेत हे चर्चासत्र होईल. कार्यशाळेत कोल्हापूर, सांगली व सातारा येथील महाविद्यालयांमधील शारीरिक शिक्षण संचालक अथवा अधिव्याख्याता, ३ खेळाडू, विद्यार्थ्यांना सहभागी होता येणार आहे. त्यांना महाविद्यालयाच्या जिमखाना बजेट हेडमधून टीए व डीए द्यावा, असे विद्यापीठाच्या वतीने सांगितले आहे.

**चर्चासत्रात सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी नावनोंदणी करावी**

**चर्चासत्रासाठी महाविद्यालयांकडून ज्यांना पाठवले जाणार आहे, त्या सर्वांची https://forms.gle/XfnqcuLwMp63au919 या लिंकवर नाव नोंदणी करावी, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण आधीविभागाचे क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी केले आहे.**